HGH INDIA® 2022

HOME DECOR ▪▪▪ GIFTS ▪▪▪ HOUSEWARE

July 12-15, 2022

INDIA EXPO CENTRE, GREATER NOIDA, DELHI NCR

NEWS 1

A TEXZONE Event

www.hghindia.com

Where business feels at home!

# मार्केटमध्ये तेजी, व्यापारात तेजी

गेल्या 2 वर्षांपासून आरोग्य व आरोग्यविषयक स्वच्छतेसंदर्भात असलेल्या एक प्रकारच्या अनामिक भीतीवर मात करत ग्राहकांनी महासाथीच्या बड्यो आता तोडल्या आहेत. रिटेल बाजारपेठही, वाढलेल्या मागणीमुळे आणि वाढलेल्या विक्रीमुळे सकारात्मक दिसू लागली आहे. विशेषतः, होम कॅटेगरीमधील उत्पादनांना सातत्याने चांगली मागणी दिसून आली असून रिटेलर्स, ब्रँड्स आणि उत्पादकांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

एकूणच, फर्निशिंगचे कापड, बेड अँड बाथ, गाद्या व उशा, रग्ज आणि घरी वापरण्यात येणाऱ्या बहुतेक वस्त्रांची गेल्या तीन तिमाहींमध्ये थोडे चढ-उतार होत चांगली विक्री झाली आहे. काही रिटेलर्ससाठी, त्यांच्या दुकानातील विक्रीच्या दृष्टीने हा सर्वोत्तम कालावधी होता. " या वर्षी ऑक्टोबर ते मार्च कालावधीत उत्तम विक्री झाल्यानंतर, एप्रिल व मे महिन्यात विक्री काहीशी कमी झाली. शाळेला लागलेल्या सुट्या आणि लोकांना तब्बल दोन वर्षांनी व्यवस्थितपणे सुटी साजरी करायची संधी मिळाल्यामुळे ते बाहेर पडले, हे विक्री कमी होण्याचे प्राथमिक कारण होते. जुलैनंतर मागणी पुन्हा वाढेल आणि दिवाळीचा हंगाम खूपच चांगला असेल, अशी आमची अपेक्षा आहे.", असे चेन्नईतील विश्वेश टेक्सटाइल्सचे संचालक सनत पटेल म्हणाले.

"गेल्या 7-8 महिन्यांपासून व्यवसाय चांगला होत आहे. याला मे महिन्यातील काही दिवस अपवाद होते. त्या कालावधीत आलेल्या सुट्ट्या हे त्याचे कारण होते. मला वाटते की, व्यवसाय वाढतच चालला आहे आणि आगामी दिवाळीच्या हंगामात आम्ही चांगली कामगिरी करू, अशी अपेक्षा आहे.", असे मुंबईतील 10 हाउसवेअर स्टोअर्सची आघाडीची शृंखला असलेल्या वन स्टॉपचे व्यवस्थापकीय संचालक जयेश देढिया म्हणाले. त्याचप्रमाणे हैदराबाद येथील दर्पण फर्निशिंगचे व्यवस्थापकीय संचालक सुलेमान हिरानी हेसुद्धा खूप आशावादी आहेत. गेल्या काही महिन्यांत आम्ही ऐतिहासिक व्यवसाय केला आहे. ग्राहकांकडून मागणी वाढत चालली आहे. आयात खर्चिक व कठीण झाल्यामुळे पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. आमच्याकडे अधिक उत्पादने आणि दुकानांमध्ये अधिक नावीन्यपूर्ण उत्पादने असली तर विक्री अजून वाढेल, अशी खात्री आहे.", असे ते म्हणतात. मुंबईतील सरप्राइझचे संचालक नीरव मेसवानी यांनी आत्मविश्वासपूर्ण आणि सकारात्मक मत व्यक्त केले आहे. "रिटेले सेगमेंटमध्ये विक्री व अभ्यागतांच्या संख्येचा विचार करता आम्ही परिस्थिती सातत्याने पूर्वपदावर आली आहे. येत्या काळात काही अनपेक्षित संकटे आली नाहीत तर दिवाळीपर्यंतच्या महिन्यांमध्ये होम सेक्टरमध्ये (घर सजावटीच्या क्षेत्रात) केला जाणारा खर्च वाढणार आहे आणि सध्याच्या एचजीएच इंडिया शोसाठी हा सर्वोत्तम कालावधी आहे.", असे ते म्हणतात.




मुंबई, दिल्ली, कोलकाता, बंगळुरू, हैदराबाद, अहमदाबाद, जयपूर, लुधियाना, पुणे आणि इंदूरमधून आलेल्या अहवालांमध्येही उत्तम व्यवसाय दिसून आला आहे. श्रेणी 2 व श्रेणी 3 शहरे व नगरांमध्ये अधिक चांगली विक्री झाल्याचे समजले आहे. कारण निमशहरी भागातील ग्राहकांकडून त्यांच्या घराच्या सजावटीवर करण्यात येणाऱ्या खर्चात काकणभर वाढ झाली आहे. ग्रेटर नोएडा येथील इंडिया एक्स्पो सेंटर येथे 12-15 जुलै 2022 या कालावधीत आयोजित होणाऱ्या एचजीएच इंडियाच्या 11 व्या पर्वाची रिटेलर्स, वितरक, घाऊक विक्रेते, संस्थात्मक खरेदीदार वाट पाहत आहेत. त्यांच्या विद्यमान तसेच नव्या पुरवठादारकडून मिळणाऱ्या नावीन्यपूर्ण उत्पादनांबद्दल ते उत्सुक आहेत.

बहुतेक रिटेलर्ससाठी पुरवठ्याची बाजू हे मोठे आव्हान आहे. कापसाची वाढती किंमत, वाढती इंधन किंमत, युक्रेनच्या युद्धपरिस्थितीमुळे कच्च्या मालाच्या व तयार मालाच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील पुरवठ्यात होणारी उलथापालथ आणि कंटेनरची वाढलेली किंमत, चीनमधील पुरवठा साखळीमध्ये झालेली उलथापालथ यामुळे रिटेल शेल्फवर वस्तूंची उपलब्धता अनियमित होती आणि किमतीसुद्धा वेगाने वाढत होत्या. आपली पुरवठा लाइन राखण्यासाठी विविध कॅटेगरींमधील रिटेलर्स या आव्हानांशी झुंजत होते, जेणेकरून त्यांना आपल्या दुकानांतून व्यवसाय आणि ग्राहक गमवावे लागू नयेत. भारतावर आधारित पुरवठा साखळी विकसित करून आयात मालावरील अवलंबित्व कमी करण्याचा जाणीवपूर्व निर्णय अनेक रिटेलर आणि वितरकांनी घेतला.

दर्जामध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा आणि भारतीय ब्रँड्स व उत्पादकांकडून डिझाइन नावीन्यतेमध्ये वाढ करण्यात आली असून ते या प्रक्रियेत मदत करत आहेत. एचजीएच इंडिया 2022 ही व्यापारासाठी आणि नावीन्यपूर्ण उत्पादने जाणून घेण्यासाठी, तसेच कॅटेगरींमधील पुरवठा स्थिर करण्यासाठी चांगली संधी असेल. या कॅटेगरींमध्ये फर्निशिंगचे कापड, ब्लाइंड्स, बेड अँड बाथ, डेकोरेटिव्ह मेड-अप्स, टेबल आणि किचन लिनेन, रग व कार्पेट, वॉलपेपर, लाकडी व सिन्थेटिक फ्लोअरिंग, सजावटीच्या ॲक्सेसरी, हस्तकला, घरासाठीचे फर्निचर, आउटडोअर लाइफस्टाइल, हाउसवेअर, किचनवेअर, कुकवेअर, ग्लासवेअर, टेबलवेअर, प्लास्टिकची उत्पादने, मुलांसाठीची गृहोपयोगी उत्पादने आणि विविध प्रकारच्या भेटवस्तूंचा समावेश आहे. एचजीएच इंडिया 2022 मध्ये 30 देशांमधील 400 हून अधिक ब्रँड्सची नावीन्यपूर्ण उत्पादने आणि भारतभरातील सर्व प्रमुख उत्पादन व निर्यात केंद्रे या प्रदर्शनात असतील.

पुढील 3-5 वर्षे होम कॅटेगरी उत्पादनांसाठी वार्षिक वाढ 20% हून अधिक असेल असा अंदाज व्यक्त केला जात असताना, भारतीय बाजारपेठ अनुकूल काळाच्या दिशेने वाटचाल करत आहे. या वाढत्या संधीचा लाभ घेण्यासाठी एचजीएच इंडियामध्ये

World of Sleep

a joint initiative by HGH | ISPF

# अधिक चांगल्या निद्रा कल्पनांसह पुन्हा आले आहे वर्ल्ड ऑफ स्लीप

एचजीएच इंडियाने गेल्या पर्वात आयएसपीएफच्या सहयोगाने (इंडियन स्लीप प्रोडक्ट्स फेडरेशन) **वर्ल्ड ऑफ स्लीप** (निद्राजगत) सादर केले होते. त्याला अभ्यागतांकडून आणि विशेषतः गाद्यांच्या रिटेलर्सकडून उत्तम प्रतिसाद लाभला होता. ही संकल्पना आता पुढे नेण्यात येणार आहे. **वर्ल्ड ऑफ स्लीपमधील** तज्ज्ञ, झोपेचा तुमच्या आरोग्यावर कशा प्रकारे परिणाम होतो आणि अधिक चांगली झोप घेऊन चांगले आरोग्य कशा प्रकारे साध्य करता येते, याबद्दल मार्गदर्शन करतील. चांगली झोप साध्य करण्यासाठी मदत करणारी उत्पादने व मटेरिअलमधील नवोपक्रम आणि नवीन ट्रेंड्स याबद्दल वर्ल्ड ऑफ स्लीपमध्ये माहिती देण्यात येईल. प्रकाश, हवेची गुणवत्ता, खोलीतील तापमान, भिंतींचे रंग, सुगंध यांच्या झोपेच्या दर्जावर होणाऱ्या परिणामांविषयी करण्यात आलेल्या संशोधनांचे निष्कर्ष यावेळी मांडण्यात येतील. अर्थातच, चांगल्या झोपेसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत घटकांमध्ये म्हणजेच बेड, गादी, उशा, चादरी आणि कम्फर्टर्स या उत्पादनांमधील नावीन्यता आणि सुधारणा यावर **वर्ल्ड ऑफ स्लीपमध्ये** तज्ज्ञ प्रकाश टाकतील.





Springfit

चांगल्या झोपेच्या आरोग्यलाभांबद्दल ग्राहक जागरुक झाल्याने नवप्रवर्तनाला चालना मिळत आहे. स्लीपवेल, किंग कॉइल, निलकमल, सेंच्युरी, स्प्रिंगफिट, रिफ्रेश, एम. एम. फोम आणि असे अनेक ब्रँडड्स त्यांच्या गाद्या, उशा, बेड्स, कम्फर्टर्सची नवीन श्रेणी सादर करतील. आरोग्यदायी आणि अधिक आरामदायी झोपेच्या अनुभवासाठी मेमरी फोम, बॉक्स स्प्रिंग्स, लेटेक्स, कॉयर, पीयू फोम हे नव्या कॉम्बिनेशनमध्ये वापरुन तसेच आधुनिक सिन्थेटिक व जेल, पाणी, हवा, कापूस, लाकडी स्प्रिंग यासारखे नैसर्गिक मेटेरिअल वापरण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे जुमॅक्स या नव्या ब्रँडची उत्पादने पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. यंदाच्या एचजीएच इंडियामध्ये ते नावीन्यपूर्ण निद्रा कल्पना सादर करणार आहेत.

या क्षेत्रात भविष्यातील व्यवसाय कल्पनांना एक दिशा देण्यासाठी गाद्या व निद्रा उत्पादनांशी संबंधित रिटेलर्स, वितरक आणि संस्थात्मक खरेदीदारांनी एचजीएच इंडियामधील हॉल 14 मधील **वर्ल्ड ऑफ स्लीप** पॅव्हेलिअनला भेट दिलीच पाहिजे. या दालनास भेट दिल्याने त्यांना आपल्या दुकानांमधून गाद्या, उशा आणि इतर निद्राउत्पादनांची विक्री वाढविण्यासाठी सज्ज होण्यासाठी मदत होईल.

# लीडर्स तयार करत आहेत नवी कुकवेअर स्टोरी...

वेगाने वाढणाऱ्या भारतीय बाजारपेठेत आपला हिस्सा वाढविण्यासाठी कुकवेअर सेगमेंटमधील अनेक आंतरराष्ट्रीय व भारतीय ब्रँड्स तसेच नव्याने पदार्पण केलेल्या कंपन्या प्रयत्नशील आहेत. यामुळे सातत्याने डिझाइनमध्ये नावीन्य येत आहे आणि सर्व प्रकारच्या किंमत श्रेणीमध्ये सुधारित उत्पादन वैशिष्ट्ये व दर्जा वाढल्याचे दिसून येत आहे. तरुण भारतीय ग्राहक पर्यावरणस्नेही, ऊर्जाबचत करणारी आणि त्यांच्या जैवीनशैलीमध्ये चपखल बसणाऱ्या आरोग्यदायी स्वयंपाकाला प्राधान्य देत असताना कुकवेअर व स्वयंपाकासाठी उपयुक्त असलेल्या उपकरणांमध्ये आधुनिक तंत्रज्ञान, फॅशन रंग, सुरक्षित मटेरिअल, स्मार्ट कामकाज व सुविधा तसेच पर्यावहणस्नेही असणे या वैशिष्ट्यांचा समावेश होतो.

सौरऊर्जेवर चालणारे कुकर, उजळ रंगाचे फुड प्रोसेसर, पोषक तत्वे कायम ठेवणारे ज्युसर्स व कुकवेअर आणि नॉन-स्टिक प्रकारांना बदलून आरोग्याच्या दृष्टीने सुरक्षित असलेल्या कुकवेअर उपलब्ध करून देण्यासाठी ब्रँड्स स्पर्धा करत आहेत.

किंबहुना, पारंपरिक बीडाचे कुकवेअर मार्केटमध्ये परत येत आहे. आरोग्याला लाभदायक असलेला पर्याय म्हणून आणि प्रीमिअम किमतीत!

हॉकिन्स, विनोद कुकवेअर, मेयर, युनायटेड एकता, स्टाल, महाराजा, ओके, भलारिया,



United Ekta



Vinod



Meyer



Stahl

रॉक्स एफएनएस, मॅकलाइट, सेलो, डेलीवेअर, रोका, ब्लॅक डायमंड, क्लासिक इसेन्शिअल्स त्यांची कुकवेअरची रेंज सादर करणार आहेत.

बदलती बाजारातील परिस्थिती लक्षात घेत, युनियाटेड एकता या प्रेशर कुकरमधील प्रस्थापित ब्रँडतर्फे अनेक नवीन उत्पादने तसेच त्यांच्या विद्यमान श्रेणीतील नावीन्यता सादर करण्यात येणार आहेत. एचजीएच इंडियाच्या या पर्वात प्रथमच मिक्सर, ग्राइंडर्स, हॅंड ब्लेंडर्स, टोस्टर्स, सँडविच मेकर्स, इस्त्री यासारखी नवीन किचन व गृहोपयोगी उपकरणांची पूर्णपणे नवीन रेंज सादर करण्यात येणार आहे. या शिवया या ब्रँडतर्फे त्यांच्या इंडक्शन कुकटॉप्समध्ये बोनेट स्टँड हे नवीन वैशिष्ट्य सादर करण्यात येणार आहे. या वैशिष्ट्यामुळे या उपकरणाची स्वच्छता सुविधाजनक व परिणामकारक होणार आहे. हे वैशिष्ट्य भारतात प्रथमच सादर करण्यात आले आहे, असा दावा या ब्रँडने केला आहे.

हॉकिन्स या भारतातील सर्वात जुन्या व घराघरांत लोकप्रिय असलेल्या ब्रँडतर्फे त्यांची श्रेणी नव्याने सादर करण्यात येत आहे. पारंपरिक ॲल्युमिनिअम व स्टेनलेस स्टीलच्या कुकरपलिकडे जात, एचजीएच इंडियाच्या या पर्वात त्यांच्यातर्फे ट्राय-प्लाय आणि डाय-कास्ट कुकवेअर म्हणजेच अप्पे पॅन, फ्राइंग पॅन आणि ग्रिल पॅनची श्रेणी सादर करणार आहेत.

मेयर या अमेरिकन कुकवेअर ब्रँडने आता भारतीय बाजारपेठेत भक्कम स्थान निर्माण केले आहे. त्यांच्यातर्फे एचजीएच इंडिया 22 मध्ये अनेक नव्या संकल्पना आणण्यात येणार आहेत. किमतीबाबत जागरुक असलेल्या ग्राहकांसाठी या ब्रँडतर्फे मुलामा दिलेल्या बीडाच्या कढया व तवे सादर करण्यात येणार आहेत आणि त्यांच्या भारतातील बाजारपेठेचा विस्तार करण्यात येणार आहे. त्यांच्यातर्फे मेयर ॲसेंट सीरिजही सादर करण्यात येणार आहे. यात या ब्रँडतर्फे विविध उपयोगांसाठी विविध आकाराच्या सहा कढया सादर करण्यात येणार आहेत. आंतरराष्ट्रीय ट्रेंड्सकडून प्रेरणा घेत मेयरसुद्धा टासला ट्राय- प्लाय सीरिजमधील हॅंडल नसलेल्या भारतीय पारंपरिक कुकवेअरची आठवण करून देणारी स्वयंपाकाची भांडी सादर करणार आहेत.

पारंपरिक स्वयंपाक संकल्पनांनी आधुनिक तंत्रज्ञानाशी सांगड घालणे आवश्यक आहे. स्वयंपाकपद्धतींमुळे सातत्याने बदल होत आहेत. अधिक कार्यक्षमता, जागेची बचत व सुविधा या दृष्टीने कुकवेअर, किचनवेअर आणि किचनमधील उपकरणांचे एकत्रीकरण होत आहे.

2022 च्या पहिल्या तिमाहीमध्ये ट्राय-प्लाय कुकवेअर, इंडक्शनसाठी सुयोग्य असलेली व प्रेस्ड ज्युसर्स, ग्रिलर्स, टोस्टर्स, मिक्सर्स आणि हॅंड ब्लेंडर्स यासारख्या स्मार्ट उपकरणांसाठी मागणी वाढल्याचे भारतभरातील रिटेलर्सना जाणवले आहे. हा ट्रेंड एचजीएच इंडिया 2022 मध्ये अधिक तीव्र होत जाईल आणि विनोद कुकवेअर, स्टाहल, एफएनएस, भरालिया, सेलो आणि अशा अनेक मार्केट लीडर्सकडून नवनवीन उत्पादने सादर करण्यात येतील.

# 2022/23 मधील ट्रेंड्स

एचजीएच इंडिया ट्रेंड्समध्ये होम प्रोडक्ट्स मार्केटमध्ये सामाजिक, जीवनशैली व तांत्रिक बदलांचा प्रभाव प्रतिबिंबीत होतो. दर वर्षी, एचजीएच इंडियामध्ये आगामी रंग, डिझाइन, मटेरिअल आणि स्टाइल्सचे भाकित करण्यात येते जे भारतीय बाजारपेठेतील होम फॅशन व लाइफस्टाइल ट्रेंडमद्ये महत्त्वाची भूमिका निभावू शकतात.

“ **विंड्स ऑफ चेंज**” हे ट्रेंड्स एचजीएच इंडियाने तुमच्यापर्यंत आणले आहे. वर्ष 2022/23 साठी नव्याने येऊ घातलेले रंग, डिझाइन आणि मटेरिअलचे सखोल संशोधन केरून एकत्रित माहिती यात असेल. आगामी हंगामांसाठी तुमची नवी कलेक्शन तयार करण्याची किंवा मागविण्याची सर्वसमवाशक डिझाइन मार्गदर्शक तत्वे तुम्हाला या ट्रेंड बुकमध्ये (पुस्तक) मिळतील. हे ट्रेंड्स भारतीय बाजारपेठांसाठी चार गटांमध्ये 2022-23 **साठी हे ट्रेंड्स डिझाइनचे घटक विशद करतात**




**- हीलिंग ग्रीन, इको आर्टिस्ट, पर्पल ॲव्हेन्यू आणि पीसफुल अंबर.** 2022/23 साठी एचजीएच इंडिया ट्रेंड्स सर्व होम कॅटेगरी म्हणजे होम टेक्सटाइल, फर्निशिंगचे कापड, होम डेकोर, ॲक्सेंट फर्निचर, हाउसवेअर आणि भेटवस्तूंना लागू आहे.

सध्या जगातील अनिश्चित वातावरणातही भारत सातत्याने पुढे जात आहे आणि जगाच्या नकाशावर मजूबत होत आहे. इथले ग्राहक खूप महत्त्वाकांक्षी आहेत आणि त्यांना आधुनिक व आंतरराष्ट्रीय व पारंपरिक स्पर्श असलेली उत्पादनांना प्राधन्य देतात.

आपल्या उत्पादनांच्या डिझाइनमध्ये नवता आणण्यासाठी आणि त्यांच्या महत्त्वाकांक्षी भारतीय ग्राहकांना जोडले जाण्यासाठी उत्पादक, ब्रँड्स, रिटेलर्स आणि प्रोफेशनल्स यांना हे ट्रेंड बुक अत्यंत उपयुक्त वाटेल. तुमच्या डिझाइन संवेदनशीलता चाचपून पाहण्यासाठी या ट्रेंड्सचा वापर करा आणि भारतीय बाजारपेठेसाठी खऱ्या उत्पादनांमध्ये नावीन्यपूर्ण डिझाइन तयार करण्यासाठी त्यांचा वापर करा.

रिटेलर्स आणि अभ्यागत एचजीएच 2022 मधील हॉल 15 मधील ट्रेंड्स पॅव्हेलिअनमध्ये आगामी होम फॅशन ट्रेंड्स जाणून व समजून घेऊ शकतात. यात **विंड्स ऑफ चेंजच्या** छत्रांतर्गत चार संकल्पनांची प्रत्यक्ष उत्पादन अंमलबजावणी दाखविण्यात आली आहे.

या ट्रेंड्स पॅव्हेलिअनमध्ये आणि एचजीएच इंडियाच्या इतर लोकेशन्सवर तुम्ही **विंड्स ऑफ चेंज** या पुस्तकाची प्रत विकत घेऊ शकता.

# सरकार व या उद्योगाचे व्यापक सहाय्य

गेल्या एक दशकात एचजीएच इंडियाचा आकार व स्तर वाढला आहेच. त्याचप्रमाणे येथील प्रदर्शक व अभ्यागतांना सातत्याने चांगले व्यवसाय परिणाम दिले आहेत. आजच्या घडीला भारतातील स्थानिक बाजारपेठेचे प्रवेशद्वार म्हणून हा ट्रेड शो ओळखला जातो. यात भारतभरातील 500 हून अधिक शहरांमधील 36,000 हून अधिक व्यापाऱ्यांशी जोडले जाता येऊ शकते. एचजीएच इंडियामधील प्रदर्शकांमध्ये प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय व भारतीय ब्रँड्स, डिझायनर्स, मोठे उत्पादन, एसएमएमई युनिट्स, आयातदार आणि निर्यातदारांचा समावेश आहे. मार्केट लीडर्स आणि आघाडीच्या भारतीय ब्रँडपासून ते सर्व खंडांमधील 3 2 देशांमधील बहुराष्ट्रीय कंपन्या एचजीएच इंडियामध्ये नियमितपणे सहभागी होत आहेत.




हस्तकाल, हातमाग आणि कुटीर उद्योग हे एचजीएच इंडियाचे सर्वात मोठे लाभार्थी राहिले आहेत. भारताच्या राष्ट्रीय पातळीवरील बाजारपेठेचा हा दीर्घकालीन प्रवेशद्वार आहे. वर्षागणिक प्रस्थापित ऑनलाइन व ऑफलाइन रिटेल शृंखलांसोबत अधिकाधिक अशा प्रकारचे उत्पादनक जोडले जात आहेत. सोर्सिंग (माल घेण्यासाठी) ट्रेंड्स व मार्केटच्या माहितीसाठी भारतातील 500 शहरे व नगरांमधील 36,000 हून अधिक व्यापाऱ्यांपैकी 70% व्यापाऱ्यांच्या वर्षाच्या कार्यक्रमांचा एचजीएच इंडिया हा भाग असतो. होम कॅटेगरीमधील भारतातील आघाडीच्या 100 रिटेल शृंखला व वितरकांपैकी (ऑफलाइन व ऑनलाइन रिटेलर्सचा समावेश करून), 95% रिटेल शृंखला व वितरक एचजीएच इंडिला नियमित भेट देतात. एचजीएच इंडियाला भेट देणाऱ्यांपैकी 90% व्यक्ती वरिष्ठ निर्णयकर्ते असतात. या शिवाय 28 देशांमधील, विशेषतः आशिया व आफ्रिकेतील उदयोन्मुख बाजारपेठांमधील खरेदीदार एचजीएचला नियमितपणे भेट देतात. त्यामुळे होम टेक्सटाइल्स, होम डेकोर, हाउसवेअर आणि भेटवस्तूंच्या कॅटेगरीमधील भारतीय उत्पादनांसाठी निर्यात संधी निर्माण होते.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील रिटेलर्स, आयातदार आणि संस्थात्मक खरेदीदार यांच्याशी लघु व मध्यम उद्योगांना जोडण्याची एचजीएच इंडियाचे सामर्थ्य आणि क्षमता लक्षात घेत भारत सरकारचे कापडउद्योग खाते व भारत सरकारचे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय, भारत सरकारच्या कापडउद्योग मंत्रालयांतगर्त असलेले हस्तकला विकास आयुक्त, हातमाग विकास आयुक्त, उत्तरप्रदेश सरकार, हरियाणा सरकार यांनी एचजीएच इंडियाला मान्यता दिली आहे. भारतात होणाऱ्या व्यापारी प्रदर्शनांपैकी एचजीएच इंडिया हे असे प्रदर्शन आहे ज्यासाठी पात्र प्रदर्शक त्यांच्या विविध योजनांच्या अंतर्गत विकास अनुदान किंवा सबसिडीसाठी दावा करू शकतात. त्यामुळे त्यांचा सहभागाचा खर्च लक्षणीयरित्या कमी होतो.

हस्तशिल्प निर्यात संवर्धन परिषद (ईपीसीएच), राष्ट्रीय ज्यूट बोर्ड (एनजेबी), नॅशनल डिझाइन सेंटर (एनडीसी), ईशान्य तंत्रज्ञान उपयोजन व संशोधन केंद्र (नॉर्थ ईस्ट सेंटर फॉर टेक्नोलॉजी ॲप्लिकेशन अँड रिसर्च - एनईसीटीएआर, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ कार्पेट टेक्नोलॉजी (आयआयसीटी), राष्ट्रीय हातमाग विकास महामंडळ (एनएचडीसी) पूर्व उत्तरप्रदेश निर्यात असोसिएशन (ईयूपीईए), काश्मीर हातमाग व हस्तशिल्प संचालनालय (डीएचएचके), आंध्रप्रदेश हस्तशिल्प विकास महामंडळ मर्यादित यासारख्या प्रस्थापित औद्योगिक संघटना त्यांच्या सदस्यांच्या सहभागाचे नियमित आयोजन करतात. एचजीएच इंडिया 22 मध्येही त्यांचे सदस्य विविध प्रकारी वैशिष्ट्यपूर्ण व व नावीन्यपूर्ण होम टेक्सटाइल, होम डेकोर, हाउसवेअर व भेटवस्तू उत्पादने प्रदर्शित करतील. यापैकी बहुतेक उत्पादने हाताने तयार केलेली असून रिटेलर्स व संस्थात्मक खरेदीदारांसाठी उत्पादने मिळविण्याच्या दृष्टीने नवा आयाम देतील.

गेल्या 11 वर्षात होम टेक्सटाइल्स, फर्निशिंग, घरातील फर्निचर, होम डेकोर, हाउसवेअर आणि भेटवस्तूंसाठी वेगाने उदयास येणाऱ्या भारतीय बाजारपेठेवर भर असलेल्या प्रदर्शकांसाठी व अभ्यागतांसाठी एचजीएच इंडिया ही निश्चितच एक विश्वासार्ह निवड आणि प्राधान्य दिला जाणारा ट्रेड शो (व्यापारी प्रदर्शन) ठरला आहे. त्यामुळे सरकार, खासगी व आंतरराष्ट्रीय व्यवसायातील सर्व भागधारकांना एचजीएच इंडिया हे आपले प्रदर्शन वाटते.

# 2022/23 मधील ट्रेंड्स | सोर्सिंग | नवीन व्यवसाय | संधी

## अभ्यागतांची प्रोफाइल

भारतातील 500 हून अधिक शहरे व नगरांमधून हजारोंनी पूर्वनोंदणी केली आहे. ग्रेटर नोएडामधील इंडिया एक्स्पो सेंटर येथे 12 ते 15 जुलैदरम्यान आयोजित एचजीएच इंडिया 22 च्या ऑटम/विंटर पर्वाची रिटेलर्स आणि ट्रेड खरेदीदार यांना किती उत्सुकता आहे हे यावरुन अधोरेखित होते. या अभ्यागतांमध्ये रिटेलर्स, वितरक, आयातदार, निर्यातदार, घाऊक विक्रेते, एजंट, लार्ज फॉरमॅट स्टोअर्स, संस्थात्मक खरेदीदार, वास्तुरचनाकार, इंटिरिअर डिझायनर्स आणि आंतरराष्ट्रीय खरेदीदार यांचा समावेश आहे. 90% अभ्यागत हे त्यांच्या संबंधित संस्थांसाठी सोर्सिंग व व्यवसायासाठी वरिष्ठ निर्णयकर्ते आहेत. आगामी सण- उत्सवांच्या काळासाठी सोर्सिंग करणे, नावीन्यपूर्ण उत्पादने शोधणे, नव्या व्यवसाय कल्पना मिळविणे आणि 2022/23 साठी उद्योन्मुख फॅशन ट्रेंड्स निश्चित करणे आणि बाजारपेठ व उद्योची दिशा याविषयी माहिती मिळविणे हे त्यांचे उद्दिष्ट असते. त्यामुळे ते त्यांच्या व्यवसायाचे नियोजन करण्यास मदत मिळेल. एचजीएच इंडिया 22 ही त्यांना नियमित पुरवठादारांना भेटण्याची तसेच नवी स्रोतांना जोडले जाण्यासाठीची उत्तम संधी आहे.

अभ्यागतांच्या नोंदणीमध्ये या वर्षी भारतातील सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचा समावेश आहे. महानगरांमधील आणि दिल्ली, मुंबई, बंगळुरू, चेन्नई, कोलकाता, अहमदाबाद, हैदराबाद, पुणे नागपूर, लुधियाना, जयपूर, चंदीगड आणि इंदूर या व्यतिरिक्त सर्व राज्यांच्या राजधान्या आणि श्रेणी II व श्रेणी III शहरांमधील रिटेलर्सनी मोठ्या प्रमाणावर नोंदणी केली आहे. यावरुन भारतीय घरगुती उत्पादनांची वाढती खोली आणि व्याप्ती आणि देशभरातील एचजीएच इंडियामध्ये वाढती अभ्यागतांची ओढ स्पष्टपणे दिसून येते.

24 देशांमधील 200 हून अधिक आंतरराष्ट्रीय अभ्यागतांनीही नोंदणी केली आहे. हे प्रामुख्याने उदयोन्मुख बाजारपेठांमधील आहेत. त्यामुळे एचजीएच इंडिया ही त्याच्या प्रदर्शकांसाठी रोचक निर्यात संधी झाली आहे.

### एचजीएच इंडिया 2022

**अभ्यागतांसाठी वेळ**

12 जुलै. : सकाळी 09.00 – सायंकाळी 06. 30

13 जुलै. : सकाळी 09.00 – सायंकाळी 06. 30

14 जुलै. : सकाळी 09.00 – सायंकाळी 06. 30

15 जुलै. : सकाळी 09.00 – सायंकाळी 05

---

**HGH INDIA® 2022**
HOME DECOR ■ GIFTS ■ HOUSEWARE
INDIA EXPO CENTRE, GREATER NOIDA, DELHI NCR

**12-15 JULY 2022**
**11th EDITION**

## ट्रेड व्हिजिटर्स !

## 02 जुलै 2022 पर्यंत ऑनलाइन नोंदणी करा आणि रु. 1000/- प्रवेश शुल्काची बचत करा

एचजीएच इंडिया 2022 हे प्रदर्शन दिल्ली एनसीआरमध्ये 12 ते 15 जुलै 2022 या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे
400 ब्रँड्स आणि उत्पादकांच्या नावीन्यपूर्ण, उच्च दर्जाच्या उत्पादने जाणून घ्या...
2002/23 साठीचे अंदाजित फॅशन व लाइफस्टाइल ट्रेंड्समधून प्रेरणा घेतलेली
तुमच्या स्पर्धकांआधी तुम्ही ही उत्पादने मिळवा

डिस्प्ले करण्यात येणारी उत्पादने




**होम टेक्सटाइल्स** फर्निचरचे कापड, पडते व ब्लाइंड्स, बेड लिनेन, सजावटीसाठीचे मेड-अप्स, गाद्या व उशा, कार्पेट, बाथ लिनेन, टेबल व किचन लिनेन. **होम डेकोर** छत, भिंत, खिडक्या, जमिनीचे आच्छादन (फ्लोअर कव्हरिंग), टेबल टॉप्स, सजावटीच्या ॲक्सेसरी, लाइफस्टाइल्स. **होम फर्निचर** कॉफी टेबल, मॅगझीन रॅक, भिंत विभाजक (वॉल सेपरेटर्स), बीन बॅग्स, एकल खुर्ची, रॅक आणि ट्रॉली, ॲसेंट फर्निचर, सोफा, बेट सेट, कपाटे, बेबी व मुलांचे फर्निटर, आउटडोअर फर्निचर, **गिफ्ट** कॉर्पोरेट, वैयक्तिक व सणासुदीचे. **हाउसवेअर** किचनमधील उपकरणे, किचनवेअर, कुकवेअर, टेबलवेअर, बाथरूम, देखभाल, स्वच्छता, स्टोरेज, आउटडोअर. **सेवा**

### एक्सक्लुझिव्ह लाभ मिळवा

- एचजीएच इंडिया 2022 मध्ये मोफत प्रवेश मिळवा
- पूर्वनोंदणी केलेले अभ्यागत म्हणून तुमचा बॅज प्राप्त करण्याच्या वेळेची बचत करा. तुमच्या ऑनलाइन नोंदणीनंतर तुम्हाला पाठविलेल्या पूर्वनोंदणी क्यूआरकोडसह तुम्ही थेट तुमचा बॅज प्रिंट करू शकता.
- एचजीएच इंडिया 2022 कॅटलॉगची मोफत प्रत
- बोनाफाइड अभ्यागतांसाठी एचजीएच इंडियाच्या कॉम्पिलमेंटरी हॉट लाउंज, फ्रुट लाउंज, पॉप कॉर्न लाउंज आणि शटल बस सेवा तसेच इतर सुविधा

*हे लाभ घेण्यासाठी आणि स्पॉट रजिस्ट्रेशन शुल्कात बचत करण्यासाठी तम्ही आमच्या www.hghindia.com या वेबसाइटवर 30 जुलै 2022 च्या आधी ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक आहे.*

### मोफत अभ्यागत नोंदणी मार्गदर्शक तत्वे

- मोफत प्रवेशासाठी ऑनलाइन नोंदणी अनिवार्य आहे. ज्या अभ्यागतांनी ऑनलाइन नोंदणी केलेली नाही त्यांना ट्रेड शोमध्ये प्रवेश घेण्यासाठी रु.1000/- इतके स्पॉट रजिस्ट्रेशन शुल्क भरावे लागेल.
- प्रदर्शक किंवा आयोजकाकडून मिळालेल्या निमंत्रण पत्रिकेमुळे तुम्ही ट्रेड शोच्या ठिकाणी मोफत स्पॉट रजिस्ट्रेशनचा अधिकार मिळत नाही
- ऑनलाइन अभ्यागत नोंदणीची शेवटच तारीख : 2 जुलै 2022

#### नियमित अभ्यागतासाठी ऑनलाइन अभ्यागत नोंदणीसह मोफत प्रवेशासाठीच्या पायऱ्या :

1. www.hghindia.comच्या होम पेजवर किंवा व्हिजिटर मेन्यूवर 'व्हिजिटर रजिस्ट्रेशन'वर क्लिक करा.
2. तुमचा रजिस्टर्ड मोबाइल नंबर किंवा ईमेल आयडी एंटर करा
3. सेंड OTP वर क्लिक करा
4. तुमच्या रजिस्टर्ड मोबाइल नंबरवर किंवा ईमेल आडीवर आलेला OTP एंटर करा.
5. तुम्ही आधीच भरलेला फॉर्म उघडेल. कृपया फॉर्ममधील तपशील (नाव, पत्ता, टेलिफोन नंबर, मोबाइल नंबर आणि ईमेल आयडी तपासून घ्या.)
6. ऑनलाइन व्हिजिटर रजिस्ट्रेशन फॉर्म पूर्ण करा
7. ईमेल आणि एसएमएसच्या माध्यमातून तुम्हा व्हिजिटर रजिस्ट्रेशन नंबर आणि क्यूआर कोड प्राप्त करा, ज्याने तुमच्या रजिस्ट्रेशनची सुनिश्चिती होते.
8. ट्रेड शोसाठी येताना तुमचा रजिस्ट्रेशन नंबर किंवा तुमच्या मोबाइलवर किंवा प्रिंट फॉरमॅटमध्ये क्यूआर कोड सोबत बाळगा.
9. एचजीएच इंडिया 2022 मध्ये तुमचा रजिस्ट्रेशन नंबर दाखवा किंवा पूर्व-नोंदणीकडत अभ्यागत डेस्कवर क्यूआर कोड स्कॅन करा आणि तुमचा बॅज प्रिंट करा.

#### नव्या अभ्यागतासाठी ऑनलाइन व्हिजिटर रजिस्ट्रेशनसह मोफत प्रवेशासाठी पायऱ्या :

1. www.hghindia.comच्या होम पेजवर किंवा व्हिजिटर मेन्यूवर 'व्हिजिटर रजिस्ट्रेशन'वर क्लिक करा.
2. तुमचा रजिस्टर्ड मोबाइल नंबर किंवा ईमेल आयडी एंटर करा
3. सेंड OTP वर क्लिक करा
4. तुमचा मोबाइल नंबर किंवा ईमेल आयडी एंटर करा आणि सेंड OTP वर क्लिक करा
5. ऑनलाइन व्हिजिटर रजिस्ट्रेशन फॉर्म पूर्ण करा
6. व्हिजिटर रजिस्ट्रेशन नंबर आणि क्यूआर कोड प्राप्त करा, ज्याने तुमच्या रजिस्ट्रेशनची सुनिश्चिती होते.
7. ट्रेड शोसाठी येताना तुमचा रजिस्ट्रेशन नंबर किंवा तुमच्या मोबाइलवर किंवा प्रिंट फॉरमॅटमध्ये क्यूआर कोड सोबत बाळगा.
8. एचजीएच इंडिया मध्ये तुमचा रजिस्ट्रेशन नंबर दाखवा किंवा पूर्व-नोंदणी अभ्यागत डेस्कवर क्यूआर कोड स्कॅन करा आणि तुमचा बॅज प्रिंट करा.

### महत्त्वाच्या सूचना

1 एन्ट्री बॅज हा एचजीएच इंडियामध्ये तुमच्या मोफत प्रवेशासाठीचे साधन आहे आणि ते अहस्तांतरणीय आहे.

2 आधीच्या वर्षापासून तुम्ही एचजीएच इंडियाचे रजिस्टर्ड व्हिजिटर असाल तर कृपया आयोजकांकडून तुमचा संदर्भ क्रमांक (रेफरन्स नंबर) मागून घ्या आणि एचजीएच इंडिया 2022 मध्ये तुमच्या रजिस्ट्रेशनचे ऑनलाइन नूतनीकरण करण्यासाठी तो वापरा.

3 एचजीएच इंडिया 2022 च्या मोफत प्रवेशासाठी पूर्वीच्या सर्व व्हिजिटर्सनी त्यांच्या रजिस्ट्रेशनचे नूतनीकरण केलेले असणे अनिवार्य आहे. नूतनीकरण केलेले नसेल तर रु.1000/- इतके स्पॉट रजिस्ट्रेशन शुल्क भरावे लागेल.

4 एचजीएच इंडिया हा फक्त ट्रेड शो (व्यापारी प्रदर्शन आहे). त्यामुळे ग्राहकांना प्रवेश नाही. किरकोळ खरेदी करण्याला परवानगी नाही. तुम्ही किरकोळ खरेदी करताना आढळलात तर तुम्ही व्हिजिटर म्हणून अपात्र व्हाल.

5 15 वर्षांखालील मुलांना प्रवेश नाही

6 कोणत्याही अभ्यागताला प्रवेश नकारण्याचा हक्क आयोजकांकडे राखून ठेवलेला आहे

**अधिक सहाय्य व प्रश्नांसाठी कृपया संपर्क**

श्री. अमर शर्मा : +91 99 676 00286 / श्री. इलाका अन्सारी : +91 99 301 72973 ईमेल : visitors@hghindia.com

**www.hghindia.com**

**रजिस्ट्रेशनसाठी : www.hghindia.com मुंबई : दूर. +91 (22) 2421 4111, दिल्ली: दूर. +91 (11) 2571 4111 ईमेल : visitors@hghindia.com**